बीड । सोमवार
१२.०५.२०२५
वर्षे : ५ अंक : ४१
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 



*६२ वर्षानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला बीड नगरपालिकेचे कायमस्वरूपी नळ कनेक्शन. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पाण्याची कायमची व्यवस्था व्हावी यासाठी नळ कनेक्शनची मागणी केली होती ती आज पूर्ण झाली तसेच लवकरच एक नवीन बोर ही तिथे घेण्यात येणार आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीच्या निमित्ताने लवकरच नवीन मोठा झेंडा येत्या दोन दिवसात बसविण्यात येणार आहे.*

# 'तुमचे रणगाडे, प्लेन, मिसाईल हे खपवण्याकरता...'
# काय म्हणाले उदयनराजे भोसले ?

**सोलापूर । प्रतिनिधी**

आजची परिस्थिती बघून बघून मला मानसिक त्रास होतोय.. राष्ट्रांमध्ये कोणी या बाजूला राहतं. कोणी त्या बाजूला राहतं. फाळणी का झाली माहित नाही? त्या वेळेच्या नातेवाईकांना विचारावे लागेल, कोणी फाळणी केली हे मला माहित नाही, त्याचं संशोधन तुम्ही करा. कुणाला काही प्राईम मिनिस्टर व्हायचं. त्यावेळेस किती जीव गेले, लोक मरताना बघताना वाईट वाटतं, कित्येक जण म्हणतात ही कुठली पद्धत आहे. कुणीतरी कुणाच्या तरी आईचा मुलगा आहे, त्यांना कसं वाटत असेल मला सांगा..? असे भाजपाचे खासदार उदयनराजे भोसले यांनी सोलापूरात एका कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलताना सांगितलं.



**शिवरायांच्या समुद्र किनाऱ्यावरील पुतळ्याचे अनावरण झाले त्याबद्दल विचारले असता ते म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आचरणात आणले तर संपूर्ण जग सुखी होईल असे खासदार उदयनराजे भोसले म्हणाले...**

उदयनराजे भोसले पुढे म्हणाले की, हा वाद मिटवण्यासाठी जागतिक पातळीवर चर्चा घडवून आणल्या तर त्या चर्चेला मी जाईन. बोललो तर सगळ्यांना वाटतं, मी बोलतो म्हणूनतुमचे रणगाडे, प्लेन, मिसाईल हे खपवण्याकरता तुम्ही हे करता का काय.? आज किती लोकांचा जीव जातोय आपण पाहतोय. एक एक वेळेस डोकं काम करायचं बंद होतं. त्या ठिकाणी बॉर्डरवर आपल्या कुटुंबातील कोण गेलं तर कसं वाटेल? जगात कोणी असू द्या, थोडं शांत बसून, आत्मचिंतन करून विचार केला पाहिजे इथं आपण काय करतोय.? याचे उत्तर कोणीतरी दिलं पाहिजे असेही ते म्हणाले.

### ● दहशतवादी कसे निर्माण झाले..?


**डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीबद्दल विचारले असता ते म्हणाले की हे डोंगर जेवढे दिसत आहेत ना ते तुम्ही आम्ही निर्माण केलेले नाहीत, पहिल्यापासून आहेत. हा निसर्ग आहे आणि निसर्गापेक्षा कोणी मोठे नाही. आज मला सांगा त्यावरून वाद सुरु आहे, कमाल आहे. दहशतवादी कसे निर्माण झाले..? का निर्माण झाले..? तुम्ही पत्रकार आहात तुम्ही विचार करा, का निर्माण झाले.? ज्याला दोन टाईम जेवण मिळत नसेल तो काय करणार ? त्यांची मुलं जर उपाशी राहत असतील तर काय करणार.?**

### ● मला मानसिक त्रास होतो

**हिंदू – मुस्लिम,हे आणि ते,सर्वांना उदंड आयुष्य लाभो. हॉस्पिटलमध्ये गेलात, कोणावर वेळ येऊ नयेपण त्यावेळेस तुम्ही काय विचार करत नाही ना ते रक्त कोणाचे आहे. तुझा ब्लड ग्रुप काय ए पॉझिटिव्ह, ए निगेटिव्ह, त्यामुळे जे चाललंय ते कोणालाही मान्य नाही. काही लोकांना मान्य असेल? मी त्या कुटुंबातील घटक आहे म्हणून हे बोलत नाही. परंतु मला तर हे अजिबात चालत नाही.. ते बघून बघून मला मानसिक त्रास होतो. छत्रपती शिवाजी महाराजांना हे अभिप्रेत होतं का.?**

# सैनिकाचा एक मॅसेज अन् खा. सोनवणेंनी केली ट्रेनच्या बुकींगसाठी मदत

## कुटूंबासाठी मिळत नव्हते ट्रेनचे बुकींग, खासदाराच्या कोट्यातून उपलब्ध केले सीट




**भारताच्या रक्षणासाठी आपले सैनिक जिवाची बाजी लावून सिमेवर लढत आहेत. विशाल करपे यांनी रेल्वे बुकींगच्या बाबतीत मॅसेज केला. यानंतर मी तातडीने शक्य ते केले. आपले पत्र सैनिकाच्या कामी यावे, यापेक्षा मोठा काय आनंद असू शकतो. त्यांची सेवा करणे आपले कर्तव्य असून मी कर्तव्य भावनेतून काम करत आहे. –बजरंग सोनवणे, खासदार, बीड.**

**अमृतसर येथून ट्रेनचे बुकींग मिळत नव्हते. इकडे तणाव असल्याने कुटूंब सुखरूप गावी पाठविणे आवश्यक होते. यामुळे मी खा.बजरंग सोनवणे यांना मॅसेज केला. त्यांनी फोन करून आपुलकीने विचारपूस करत तातडीने पत्र देऊन मला मदत केली. यामुळे खून आनंद वाटत आहे. –विशाल करपे, भारतीय सैनिक.**

**बीड । प्रतिनिधी**

भारताने पाकिस्थानविरूध्द ऑपेरशन सिंदूर सुरू केल्यानंतर भारतीय सैन्य रात्रंदिवस कामाला लागले. अशावेळी आपले कुटूंब गावी पाठविलेले बरे म्हणून एका सैनिकाने ट्रेनचे बुकींग करण्याचे प्रयत्न केले. परंतु तिकीट मिळत नव्हते. यानंतर सैनिकाने बीडचे खा.बजरंग सोनवणे यांना एक मॅसेज केला. यानंतर अवघ्या तिस सेकंदात सोनवणेंनी परत फोन करून समस्या ऐकून घेतली आणि तातडीने रेल्वेबोर्डला पत्र लिहून स्वतच्या कोट्यातील आरक्षीत सीट ▶▶ उर्वरित पान २ वर

# 'शरद पवारांच्या नव्या भूमिकेमुळे सगळंच बदलून जाईल'

## पृथ्वीराज चव्हाणांचा इशारा; म्हणाले, 'ते तिकडे गेले तर...'

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या राजकारणात मागील काही दिवसांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे वारे वाहत असतानाच ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यावरून केलेल्या एका वक्तव्यानं सर्वांचच लक्ष वेधलं. पवारांच्या या वक्तव्यानं ते राजकारणात पुन्हा एकदा नवा प्रवाह जोडण्याचे संकेत देत आहेत का? असा प्रश्न अनेकांना पडला. ज्यानंतर ज्येष्ठ काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी राष्ट्रवादी एकत्र येण्यासंबंधीचं पवारांचं विधान का केलं हे मला माहित नाही पण यातून त्यांच्या सहकाऱ्यांची सत्ते साठीची हतबलता दिसते, असं निरिक्षण नोंदवलं आहे.



समजा पवार तिकडे गेलेच तर त्याचा मविआवर फारसा परिणाम होणार नाही, विरोधी पक्षाची भूमिका काँग्रेस सक्षमपणे निभावेल, असंही चव्हाण म्हणालेत. पण पवारांचं आजवरचं राजकारण हे जातीयवाद पक्षांविरोधात राहिलेलं आहे त्यामुळे त्यांच्या या नव्या भूमिकेमुळे सगळंच बदलून जाईल असंही चव्हाण मत त्यांनी झी २४ ताससह झालेल्या शुलश्रींीळींश संवादादरम्यान मांडलं.

'कोणाच्या नेतृत्त्वाखाली मविआ चालते असं म्हणणं योग्य नाही. मुळात मविआ आणि इंडिया आघाडीचं भविष्य दिल्लीतले नेते ठरवतील. स्थानिक स्वराज्यसंस्थाच्या निवडणुकीच्या या माहोलात शरद पवारांचं वक्तव्य लोकांना संभ्रमात टाकणारं आहे. मुळात कोणासोबत जायचं हा त्यांच्या पक्षाचा प्रश्न आहे. पण तरीही पक्षाची एक भूमिका अशी असते. कदापि आम्ही जातीयवादी पक्षाशी तडजोड करणार नाही ही एक भूमिका. आणि मग जर लोकांचं ▶▶ उर्वरित पान २ वर

# पाकमध्ये राफेल आणि मिराजचा मलबा सापडला; अमेरिकेतील वॉशिंग्टन पोस्टच्या खुलास्याने भारतात खळबळ

**नवी दिल्ली**

पाकिस्तानवर करण्यात आलेल्या हवाई हल्ल्यादरम्यान भारताने दोन फायटर जेट्स गमावल्याचा गंभीर दावा अमेरिकेतील The Washington Post ने केला आहे. या हल्ल्यांनंतर सोशल मीडियावर आलेल्या व्हिज्युअल्सच्या आधारे वॉशिंग्टन पोस्टने ही माहिती प्रसिद्ध केली आहे. या रिपोर्टनुसार, भारताच्या अत्याधुनिक राफेल आणि मिराज २००० फायटर जेट्सचा मलबा पाकिस्तान आणि पाक-अधिकृत काश्मीरमध्ये सापडल्याचे स्पष्ट दिसून येते. भारत सरकार किंवा भारतीय ▶▶ उर्वरित पान २ वर



# अजित पवार नांदेडमधील शहीद जवानाच्या कुटुंबीयांना भेटले; आई-वडिलांसह वीरपत्नीला दिला शब्द

**नांदेड । प्रतिनिधी**

भारत-पाकिस्तान सीमारेषेवर सध्या तणावाचे वातावरण असून भारताने एअर स्ट्राईक केल्यानंतर बॉर्डरवर गोळीबार सुरू आहे. त्यामध्ये आत्तापर्यंत भारतमातेच्या रक्षणासाठी तैनात असलेल्या काही जवानांना वीरमरण प्राप्त झालं आहे. जम्मू काश्मीर येथील श्रीनगर येथील अपघातात वीरमरण प्राप्त झालेल्या नांदेडच्या सचिन वनंजे यांना वीरमरण आले. त्यानंतर, त्यांच्या मूळगावी शोकाकुल वातावरणात आणि ग्रामस्थांच्या मोठ्या गर्दीत त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला. नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथे त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी लोकप्रतिनिधींसह हजारो नागरिक अंत्यविधीला उपस्थित होते. आपल्या आठ महिन्याच्या मुलीला कडेवर घेऊन सचिन वनंजे यांच्या पत्नीने शहीद पतीला अखेरचा निरोप दिला. हृदय पिळवटून टाकणारं हे दृश्य पाहून अनेकांचे डोळे पाणावले. आता, ▶▶ उर्वरित पान २ वर



# 'लाडकी बहीण'च्या नावाने कोट्यवधींचा घोटाळा; गुजरातमधून २५०० मुंबईकर...; पोलिसांच्या हाती घबाड




**मुंबई । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये गेम चेंजर ठरेलल्या 'लाडकी बहीण' योजनेच्या नावाखाली मुंबईमध्ये अडीच हजार जणांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणामध्ये जुहू पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे. 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत पैसे मिळवून देण्याच्या ▶▶ उर्वरित पान २

# रामप्रसाद डोईफोडे यांची मास्टर ट्रेनर म्हणून नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय नैसर्गिक शेतीमिशन अंतर्गत महाराष्ट्र शासन कृषी विभाग यांच्यामार्फत रामप्रसाद डोईफोडे यांची मास्टर ट्रेनर म्हणून नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रीय मिशन नैसर्गिक शेती प्रशिक्षण कालावधी २० ते २३ मे यादरम्यान नॅशनल फार्मिंग सायन्स युनिव्हर्सिटी गुजरात येथे आयोजित करण्यात आले आहे. बीड तालुक्यातील प्रगतिशील शेतकरी श्री रामप्रसाद डोईफोडे हे मागील अनेक वर्षापासून नैसर्गिक पद्धतीने शेती करत आहेत त्यांनी नैसर्गिक शेतीमधील केलेले कार्य विषमुक्त अन्नधान्याचा प्रसार व प्रचार करून लोकांना विषमुक्त अन्नधान्याचा पुरवठा होण्या साठी ते नेहमी प्रयत्न करत आहे.



तसेच त्यांच्या गुगळादेवी नैसर्गिक गटामार्फत पाणी फाउंडेशन च्या स्पर्धेमध्ये भाग घेऊन आपले शेती मध्ये नवनविन प्रयोग करून आपली शेती रासायनीक मुक्त करून सेंद्रिय शेतीकडे वाटचाल करत आहे पारंपारिक शेतीला फाटा देऊन सुधारित पद्धतीने शेती करण्याची त्याची नेहेमी धडपड असते राम प्रसाद डोईफोडे हे त्यांच्या शेती गटाच्या माध्यमातून शेती मधे कसल्याच प्रकारचे केमिकल खते व औषधे वापरत नाहीत. पूर्णत निसर्गाच्या माध्यमातून ते शेती करीत आहे जसे की जीवामृत घनजीवामृत, गोमूत्र दशपर्णी अर्क निमास्त्र गुळ ताक इत्यादीचा वापर करत शेतीमधील नवनवीन प्रयोग करत असतात त्यांचा या कार्याची दखल शासन स्तरावर घेण्यात आलेली आहे. मास्टर ट्रेनर म्हणून नियुक्ती केल्याबद्दल रामप्रसाद डोईफोडे रा. ईट तालुका जिल्हा बीड यांनी शासनाचे आभार मानले आहेत. रामप्रसाद डोईफोडे यांना पुढील कार्यास दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे, नारायण नरनाळे यांनी शुभेच्छा दिल्या.



# आता देशद्रोह्यांना शोधण्याची मोहीम हाती घ्यावी !

पहलगाम येथील आतंकवादी हल्ल्यानंतर भारताने प्रत्युत्तरादाखल राबवलेल्या ऑपरेशन 'सिंदूर'ने समस्त भारतीयांमधील देशप्रेम कमालीचे जागवले. हे देशप्रेम समस्त भारतीय परस्परांतील चर्चांतून आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यक्त करत होते. युध्दविरामामुळे काही जण काहीसे नाराज झाले असले, तरी भारताने घेतलेला निर्णय समस्त भारतीयांच्या हिताचाच असणार यावर दृढ विश्वास असणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून देशप्रेमाची पोचपावती देताना बहुतांश जण भारतीय सैनिकांच्या शौर्याचे कौतुक करत होते, त्यांच्या सुरक्षेसाठी प्रार्थना करत होते आणि इतरांनाही प्रार्थना करण्याचे आवाहन करत होते. भारतीय सैन्याचे कौतुक करताना आपल्या शत्रूराष्ट्राचा करता येईल तेव्हढा तिरस्कारही केला जात होता. दहशतवादाला पोसणाऱ्या पाकिस्तानला जन्माची अद्दल घडावी अशी इच्छा प्रत्येक जण व्यक्त करत होता. अशातच भारतात राहून येथील सुख सुविधांचा लाभ घेणाऱ्या काही पाकिस्तानप्रेमींना मात्र पोटशूळ उठला आणि त्यांनी आपले पाकप्रेम सोशल मीडियावर दाखवण्याचा प्रयत्न केला. रत्नागिरीमध्ये अशाच एका पाकिस्तानप्रेमीचा शोध घेऊन नागरिकांनी त्याला चांगलाच चोप दिला. त्यापाठोपाठ पुण्यातील सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये शिकणाऱ्या खादिजा शेख या तरुणीने 'पाकिस्तान झिंदाबाद' असे लिखाण सोशल मीडियावर प्रसारित केले. तिच्या पाकप्रेमाच्या विरोधात पोलिसांत तक्रारही करण्यात आली असून सदर तरुणीला अटकही करण्यात आली आहे. सिंहगड इन्स्टिट्यूटमधूनही तिला काढून टाकण्यात आले आहे. युद्धविराम झाला असला तरी स्वातंत्र्यानंतर आजवरचा पाकिस्तानचा इतिहास पाहता पाकिस्तानच्या कुरापत्या काही थांबणाऱ्या नाहीत. आयएमएफ कढून आठ हजार कोटी रुपयांचे कर्ज मिळाल्यावर पाकिस्तान हा पैसा आपले शस्त्रबळ वाढवण्यासाठी करेल हे निश्चित आहे. आज जरी युद्ध थांबले असले, तरी येणाऱ्या काळात त्याची कधीनाकधी ठिणगी निश्चित पडेल असे अनुमान तज्ञ मंडळींकडून वर्तवले जात आहे. त्यामुळे भविष्यात मोठे युद्ध झाल्यास भारताची अंतर्गत सुरक्षा व्यवस्था बिघडवण्याचे काम देशाचे खाऊन शत्रूचे गुणगान गाणाऱ्या मंडळींकडून केले जाण्याची दाट शक्यता आहे. सोशल मीडियावर आपले पाकिस्तानप्रेम उघडपणे व्यक्त करणाऱ्यांची संख्या अल्प आहे ; मात्र छुप्या पद्धतीने ते पाकप्रेम उराशी बाळगणारे या देशाने लाखोंच्या संख्येने असतील. पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानी नागरिकांना देशाबाहेर काढण्याच्या मोहिमेत अनेक धक्कादायक बाबी निदर्शनास आल्या. देशातील लाखो महिलांनी पाकिस्तानी पुरुषांशी लग्न करून त्या आणि त्यांची मुले गेल्या कित्येक वर्षांपासून भारतातच राहत असल्याचे या मोहीमेतूनच समोर आले. त्यांच्या आणि त्यांच्या मुलांकडे भारताचे अधिकृत आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, पॅन कार्ड आणि पासपोर्टसुद्धा आहेत. भारतातील स्वपंथीयांना डावलून पाकिस्तानी नागरिकांशी निकाह करणारया अशा महिलांचे आणि आणि त्यांच्या मुलांचे इमान कोणाशी आहे वेगळे सांगायला नको. अशांना भारतात ठेवायचे कि पाकिस्तानात पाठवायचे असा यक्षप्रश्न सुरक्षा यंत्रणांपुढेही निर्माण होतो. आजवर भारतात जे काही आतंकवादी हल्ले झाले आहेत ते सर्व पाकपुरस्कृत असले, तरी कोणतीही आतंकवादी कारवाई ही स्थानिकांच्या मदतीशिवाय पूर्ण होत नाही हे सर्वांनाच ठाऊक आहे. या आतंकवाद्यांना साहाय्य करणारे, त्यांना रसद पुरवणारे, त्यांच्या राहण्या-खाण्याची सोय करणारे भारतातील स्थानिक नागरिकच होते. आजमितीला घुसखोरी ही भारतासमोरील एक मोठी समस्या आहे. बांगलादेशी, रोहिंग्या घुसखोरांची संख्या आज कोटींच्या घरात गेली आहे. त्यांना शोधणे आणि शोधून त्यांच्या देशात पाठवणे आज सुरक्षा यंत्रणांसमोरील मोठे आव्हान आहे कारण यातील बहुतांश लोकांकडे भारताची अधिकृत ओळखपत्रे आहेत. ही ओळखपत्रे त्यांना उपलब्ध करून देणारे, त्यांच्या निवासाची आणि रोजीरोटीची सोय करणारे देशद्रोही भारतातच राहतात. आज युद्धविराम झाला आहे. सैनिकी कारवाया थांबल्या आहेत, आता अंतर्गत सुरक्षा यंत्रणांनी कार्यान्वित होण्याची नितांत आवश्यकता आहे. शत्रूला चोख उत्तर दयायचे असेल तर देशाची अंतर्गत सशक्तताही तितकीच महत्वाची आहे. येत्या काळात देशाच्या कानाकोपऱ्यात वसणाऱ्या देशद्रोही मंडळींना शोधून त्यांच्यावर देशद्रोहा अंतर्गत कारवाई करण्याची मोहीम सरकारने हाती घ्यायला हवी. या मोहिमेत जनतेचा सहभागही अत्यंत महत्वाचा असून आपल्या आजूबाजूला अशी मंडळी वावरत असल्याचे जाणवल्यास त्याची सुरक्षा यंत्रणांना वेळीच खबर देण्याचे काम जनतेला करावे लागणार आहे. बाहेरील शत्रूशी दोन हात करण्यास आपले सैन्यबळ पूर्णतः सक्षम असल्याचे मागील आठवडाभरात आपण पहिलेच आहे आता आपल्यालाही आपली देशभक्ती दाखवण्याची संधी असून आपल्या भोवताली वावरणाऱ्या देशद्रोह्यांना वेचून पोलिसांच्या ताब्यात देऊया !

– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई

पान १ वरून पुढे...

## सैनिकाचा एक...

सैनिकाच्या कुटूंबियासाठी उपलब्ध करून दिली. पहेलगम येथे दहशतवादी हल्ला झाल्यानंतर भारताने या दहशतवादी हल्ल्या बदला घेण्यासाठी ऑपरेशन सिंदूर सुरू केले. यानंतर देशाच्या सिमेवर तणाव निर्माण झाला. अमृतसर येथे अंबाजोगाई तालुक्यातील बाबळगाव येथील विशाल हनंमतराव करपे पाटील हे सैन्यात काम करत आहेत. अमृतसर येथेही ड्रोनहल्ले करण्यात आले. अशावेळी आपले कुटूंब गावी पाठवावे, असा निर्णय सैनिक असलेले विशाल करपे यांनी घेतला. यानंतर दि.९ रोजी त्यांनी ट्रेन बुकींगसाठी प्रयत्न केले. परंतु सर्वत्र गोंधळाची स्थिती असल्याने ट्रेनमध्ये प्रवाशांची संख्या वाढली. परिणामी, तिकीटाचे बुकींग मिळत नव्हते. दोन दिवस प्रयत्न करूनही तिकीट बुकींग होत नाही, हे लक्षात आल्यानंतर करपे यांनी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांना तिकीट बुकींग करण्याबाबत काही मदत होईल का, या भावनेने दि.१० रोजी मॅसेज केले. मॅसेजनंतर अवघ्या तीस सेकंदात खा.सोनवणे यांनी करपे यांनी कॉल करून काय मदत करावी, असे म्हणत त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले. यानंतर तातडीने रेल्वेबोर्डला लिहले. सदरील पत्र रेल्वेविभागाचे विभागीय कार्यालय,फैजपुर येथे पाठविण्यात आले. यानंतर तातडीने त्यांना दि.११ मे रोजीची बुकींग मिळाली. दि.११ रोजी सकाळी करपे यांच्या पत्नी, दोन मुले ट्रेममध्ये बसवून गावी पाठविण्यात आले. यावेळी विशाल करपे यांनी सैनिकाच्या मदतीला खासदार आले, याबाबत आभार मानले.

## 'शरद पवारांच्या...

मत पडलं तर आमची काही हरकत नाही.... ही दुसरी भूमिका.

पवार साहेबांचं राजकारण पाहिलं तर फुले-शाहू-आंबेडकर, विचार, लोकशाहीत दृढविश्वास अशा तत्त्वांवर त्यांनी राजकारण केलं आहे. मोदी सरकारचं काय चाललं आहे हे आपण पाहतोय. त्यांच्याशी तडजोड करण्याकरता किंवा त्यांच्या सत्तेचा वाटा मिळवण्याकरता त्यांच्याशी हातमिळवणी करणं हा, किंवा तसा निर्णय घेतला तर सत्तेत सामील व्हायला हरकत नाही... असं म्हणणं हा एक मोठा बदल त्यांच्या विचारात दिसत आहे'.

एका मुलाखतीदरम्यानच्या अनौपचारिक गप्पांदरम्यान दोन्ही राष्ट्रवादींनी एकत्र यायचं की नाही याचा निर्णय पुढच्या पिढीने घ्यावा, मी त्या निर्णय प्रक्रियेत नाही असं पवार म्हणाले होते, ज्यावर चव्हाणांनी आपली भूमिकाही मांडली.

'तरुण पिढीला सत्तेशिवाय राहता येणार नाही. त्यामुळे ती पिढी आग्रह करत असेल तर.... मुळात त्यांच्या पक्षात अंतर्गत काय चाललं आहे हे मी बोलणं योग्य नाही आणि मी ते करणारही नाही. पण कदापि तडजोड करणार नाही ही भूमिका आता राहिलेली नाही हे स्पष्ट होत आहे. पवार अतिशय ज्येष्ठ नेते आहेत त्यामुळे विश्वासार्हतेवर मी बोलणार नाही. पण आतापर्यंतच्या राजकारणात त्यांनी कायम जातीयवादी विचारांविरोधात भूमिता घेतल्या आहेत. काही ठिकाणी तडजोडी झाल्याही असतील. २०१४ मध्ये राज्यात स्थिरता आणण्यासाठी आम्ही पाठींबा देऊ असंही झालं होतं'. असा संदर्भ देत चव्हाणांनी नाण्याची दुसरी बाजूही समोर आणली. राजकीय पार्श्वभूमीवर पवारांची भूमिका कायमच लोकशाहीवादी, समतावादी, पुरोगामी, जातीयवादविरोधी राहिली आहे.

पान १ वरून पुढे...

ती भूमिका बदलली आहे का ? भूमिका बदलणार नाही असं ते म्हणालेले कुठेही दिसत नाहीत या मुद्द्याकडे चव्हाणांनी लक्षस वेधलं. त्यामुळं पक्षाने कुठे जावं हे मला मान्य आहे, असं ते म्हणाले असतील तर हे दुर्दैवी आहे असं स्पष्ट मत त्यांनी मांडलं. आता संकेत स्पष्ट आहेत कि निम्मी माणसं अजित पवार गटात सामील होण्यासाठी उत्सुक आहेत, त्यामुळे हे स्पष्ट आहे असं म्हणत मुद्दा मविआचा असेल तर काँग्रेस पक्ष भाजपविरोधी भूमिका घेऊन काम करणारा आहे आणि जे येतील ते येतील नाही येतील तर आम्ही एकटे जाऊ असं ठाम मत त्यांनी मांडलं.

मुलाखतीदरम्यान एकंदर स्थिती पाहता, जर तरच्या गोष्टी मी करणार नाही. कोणी कुठं जावं, काय करावं हा ज्यांचात्यंचा प्रश्न आहे. अंतिम फैसला होईल तेव्हा पाहू अशा भूमिकेवर लक्ष वेधत '(पवारांच्या) अनुयायांनी निर्णय घेतलाच असेल तर पवार साहेब तरी काय करणार ? एकंदरित हतबलतेचं चित्र दिसत आहे', असं सूचक वक्तव्य त्यांनी केलं.

महाराष्ट्राच्या राजकारणात चढ-उतार येतात असं म्हणत त्यांनी काही राजकीय समीकरणं मांडली. महाराष्ट्राच्या राजकारणासह स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये याचे परिणाम दिसून येईल. बाकी कोणी सोडून गेलं तर आम्ही एकटेच राहू मात्र इतक्यात शिवसेना जाईल असं वाटत नाही. त्यामुळं आम्ही एकत्र राहू असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नागरिकांच्या हाती मोठी ताकद... 'देशाच्या राजकारणात एका पक्षाच्या हातात सूत्र द्यायची का? आणि लोकशाहीला लोकशाही म्हणायचं का? हे देशाचे नागरिक ठरवतील. लोकशाही टीकवायची असेल तर परस्परविरोधी दोन विचार हवेत, त्या विचारांची लढाई झाली पाहिजे', असं म्हणताना भारतात मात्र सध्या बहुपक्षीय लोकशाही नकोय. हुकूमशाही हवीये, एकपक्षीय लोकशाही हवीये ही वस्तूस्थिती त्यांनी समोर आणत विचारधारा कमी झाली आहे अशा शब्दांत नाराजीचा सूर आळवला. 'राजकीय पक्षाअंतर्गतच लोकशाही कमी आहे. कुटुंबाशी निगडीत असणारे पक्ष निर्माण होत आहेत. ते विचारावर आधारित नाहीत, ते फक्त सत्ता आपल्याकडे कशी ठेवायची यावर आधारित आहेत. त्यामुळं भारतीय लोकशाहीला धोका निर्माण झाला आहे', असं निरीक्षणही त्यांनी अधोरेखित केलं.

## पाकमध्ये राफेल...

लष्कराकडून यावर कोणतेही अधिकृत वक्तव्य अद्याप आलेले नाही. मात्र, पाकिस्तानकडून सांगण्यात आले आहे की त्यांनी ५ भारतीय फायटर जेट्स पाडले. अमेरिकेतील The Washington Post च्या दाव्यावर भारताकडून अजून कोणतीही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

स्फोटके नाश करणारे अमेरिकन लष्कराचे माजी तज्ञ ट्रेव्हर बॉल, फ्रेंच संरक्षण संस्था आणि ऒींरींश्रीं च्या तज्ञांनी या दृश्यांची पडताळणी केली. त्यांनी असेही सांगितले की, जेट कोसळले की पाडण्यात आले हे निश्चित करता आलेले नाही.

भारत सरकारची शांतता: या प्रकरणावर भारत सरकारकडून कोणतीही पुष्टी किंवा नकार आलेला नाही. संकटाच्या काळात भारत सरकार ऑपरेशनल डिटेल्सवर फार बोलत नाही, असे स्टॅनफोर्ड विद्यापीठातील तज्ज्ञांनी स्पष्ट केलं.

राजकीय संदेश आणि संघर्षाचं गांभीर्य: ही घटना भारतासाठी हवाई लढाईतील सर्वात मोठी तांत्रिक हानी ठरू शकते. २०१९ नंतर प्रथमच

पान १ वरून पुढे...

भारत आणि पाकिस्तानमधील संघर्ष एवढ्या टोकाला गेला आहे. भारताने नुकत्याच काश्मीरमध्ये पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याचा बदला घेण्यासाठी पाकिस्तानातील लक्ष्यांवर हल्ले सुरू केले होते.

## अजित पवार...

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पीडित कुटुंबीयांची भेट घेत सांत्वन केले. तसेच, सरकारला जे शक्य आहे, ते तुमच्या कुटुंबीयांसाठी करू, असे आश्वासनही दिले. भारत पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर ६ मे रोजी जम्मू काश्मीर येथील श्रीनगर येथे आठ फूट खोल दरीत वाहन कोसळल्याने त्यावेळी ड्युटीवर असलेल्या नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथील २९ वर्षीय सचिन वनंजे यांचा मृत्यू झाला होता. तांत्रिक बाबी पूर्ण झाल्यानंतर सचिन यांचं पार्थिव देगलूरला आणण्यात आलं. त्यावेळी पत्नी, भाऊ आणि आई वडिलांसह उपस्थितांना अश्रू अनावर झाले होते.दरम्यान, आज अजित पवार यांनी भेट दिल्यानंतरही कुटुंबीयांना अश्रू अनावर झाले. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आज नांदेड जिल्हा दौऱ्यावर होते, या दौऱ्यात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये काही पक्षप्रवेश केल्यानंतर अजित पवारांनी शहीद कुटुंबीयांची भेट घेतली. देगलूर येथील शहीद जवान सचिन वनजे यांच्या कुटुंबीयांची भेट घेत अजित पवारांनी वीर माता-पिता आणि वीरपत्नीचे सांत्वन केले. तसेच, आम्हाला जे प्रयत्न करता येईल ते आम्ही सर्व प्रयत्न करू असे आश्वासन दिले. आम्ही दोघेजण एज्युकेटेड आहोत, त्यामुळे मला आणि माझ्या दिराला नोकरी मिळाली पाहिजे अशी मागणी वीरपत्नीने सरकारकडे केली आहे. दरम्यान, यावेळी गावात शहीद सचिन वनंजे यांचे स्मारक उभारण्यात येईल, त्यासंदर्भातही उपमुख्यमंत्र्यांनी स्थानिक नेत्यांसोबत चर्चा केली.

सध्या शिक्षणाचा खर्च वाढलाय, बाळासाठी मदत करा – कुटुंबीयांना घर आणि नोकरी देण्याचं आश्वासन अजित पवारांनी दिलंय. तसेच, गावात शहीद सचिन वनंजे यांचं स्मारक उभारण्याची घोषणा देखील करण्यात आली आहे. माझ्या बाळाला मला मोठं करायचं आहे, तिची जबाबदारी माझ्यावरती आहे. खूप काही आहे, आज शिक्षणाचा खर्च किती महागला आहे. त्यामुळे, सरकारने माझ्या बाळासाठी मदत करावी, अशी मागणी सचिन वनंजे यांच्या पत्नीने केली आहे.

## 'लाडकी बहीण'...

नावाखाली खाती उघडून ती खाती सायबर गुन्हेगारांना विकणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला आहे. या घोटाळेबाजांनी मुंबईमधील वेगवेगळ्या भागातील अडीच हजार जणांना गंडा घातला आहे. विशेष म्हणजे गुजरातमधून २५०० मुंबईकरांना हा गंडा घालण्यात आला आहे.

खातं सुरु केल्यावर हजार रुपये द्यायचे अन...मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी हा गुजरातमधील सूरतमधील असून त्याने मुंबईतील झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्यांना लक्ष्य केलं. मुंबईतील नेहरु नगर, डी.एन. नगर, धारावीमधील नागरिकांना या टोळीने गंडा घातल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. दर महिन्याला तुम्हाला 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत दीड हजार रुपये मिळतील असं सांगून या टोळीने अनेकांच्या नावाने बँक खाती सुरु केल्याचं वृत्त 'मिड डे'ने दिलं आहे. त्यांनी बँक खाती सुरु करणाऱ्यांना सुरुवातीला एक हजार रुपये दिले. तसेच उरलेले ५०० रुपये पुढील काही महिन्यांमध्ये तुम्हाला मिळतील असं सांगितलं.

पान १ वरून पुढे...

मात्र आरोपींनी नंतर ही खाती सायबर गुन्हेगारांना आणि मनी लॉन्ड्रींग करणाऱ्या आरोपींना विकली.

पुरुषांच्या नावानेही खाती– जुहू पोलिसांनी केलेल्या तपासामध्ये काही बँकांनी व्हेरिफिकेशन आणि इतर पात्रता तपासून पाहिली नाही. खास करुन चाळीत राहणाऱ्या खात्यांचं व्हेरिफिकेशन झालं नाही. पोलिसांनी आतापर्यंत १०० हून अधिक खाती बंद केली आहेत. विशेष म्हणजे नावाप्रमाणे 'लाडकी बहीण' योजना ही महिलांसाठी असतानाही अनेक पुरुषांच्या नावानेही खाती सुरु करण्यात आली होती. तुम्हालाही या योजनेअंतर्गत महिन्याला दीड हजार रुपये मिळतील असं फसवणूक करणाऱ्या टोळीनं सांगितलं होतं.

कसं समोर आला हे प्रकरण ? नेहरुनगरमध्ये राहणारा २२ वर्षीय मजूरी करणारा वलिक सय्यद खान याने या प्रकरणामध्ये विले-पार्ले पश्चिम येथे तक्रार दाखल केल्यानंतर हा प्रकार समोर आला. वलिकच्या पत्नीला १३ फेब्रुवारी रोजी परिसरातील काही जणांनी 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत महिन्याला दीड हजार रुपये मिळतात असं सांगितलं. सीमकार्ड वापरुन बँक खातं सुरु करा आणि तुमच्या आधार कार्ड तसेच पॅन कार्डची फोटो कॉपी द्या असं वलिक आणि त्याच्या पत्नीला सांगण्यात आलं. वलिकने पत्नीबरोबर बॅकेत जाऊ तिचं खातं उघडून घेतलं. त्यानंतर या टोळीच्या माध्यमातून खातं उघडलं त्या टोळीतील आरोपीने वलिकला एक हजार रुपये दिले. १५ फेब्रुवारी रोजी वलिकने पुन्हा एकदा या व्यक्तीला फोन करुन इतर काही जणांची खाती उघडायची असल्याचं सांगितल्यानंतर या टोळीतील सदस्य नेहरु नगरमध्ये आला. मात्र त्यावेळी स्थानिकांना या व्यक्तीवर संशय आल्याने स्थानिकांनी जुहू पोलिसांना याबद्दल माहिती दिली. पोलीस निरीक्षक प्रवीण पाटील आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक रणजित चव्हाण यांनी तातडीने या ठिकाणी दाखल होत संशियताला ताब्यात घेतलं. त्यावेळी आरोपीची ओळख पटली. अविनाश कांबळे नावाचा हा २५ वर्षीय तरुण वसईचा रहिवाशी असून त्याने फाल्गून जोशी, रितेश जोशी, प्रतिक, श्रुती रवी राऊत यांच्या आदेशानुसार खाती उघडून दिल्याचं पोलिसांना सांगितलं. त्याने प्रत्येक खात्यामागे आपल्याला ४ हजार रुपये दिले जायचे अशीही कबुली दिली.

तपासामध्ये धक्कादायक खुलासा– वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील जाधव यांनी जुहू पोलिस ठाण्यातील कर्मचाऱ्यांची एक टीम तयार केली. या टीमच्या तपासामध्ये कांबळे हा झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या अशिक्षित लोकांना लक्ष्य करायचा असं दिसून आलं. खातं उघडल्यानंतर ही टोळी खात्याशी संलग्न सीमकार्ड, कागदपत्रं ज्यात पासपोर्ट, आधार कार्ड आणि पॅन कार्डसारख्या महत्त्वाच्या कागदपत्रांची प्रत घ्यायचे. त्यानंतर कांबळी ही खाती रितेश जोशी, श्रुती राऊत आणि फाल्गुनी जोशी यांना विकायचा.

कोट्यवधींचे व्यवहार– वरिष्ठ पोलीस निरीक्षक लांडगे यांनी दिलेल्या माहितीनुसार, आम्ही बँकांशी संपर्क साधून खाती गोठवली आहेत. आम्ही श्रुती राऊतच्या घरावर छापा मारला असून तिच्याकडे अनेक पासबुक, डेबिट कार्ड आणि सीम कार्ड सापडले. फाल्गुनी जोशीलाही अटक करण्यात आली असून तिच्या घरी अनेक पासबुक सापडली. आम्ही गोठवलेल्या १०० हून अधिक खात्यांमध्ये १९ लाख ४३ हजार ७७९ रुपये आहेत. या खात्यांवरुन कोट्यवधींचे व्यवहार झालेत. ही खाती सायबर गुन्हे आणि मनी लॉन्ड्रींबरोबरच काळ्या पैशांच्या व्यवहारासाठी वापरली जायची.

पान ४ वरून पुढे...

## अखेर पवनचक्की...

पाटोदा तालुक्यातील दासखेड ग्रूप ग्रामपंचायत अंतर्गत बेडुकवाडी येथील शेतकरी शिवाजी बाजीराव शिंदे आणि त्यांचा मुलगा बालाजी शिंदे यांनी डॉ.गणेश ढवळे यांच्याशी संवाद साधताना काल दि.१० शनिवार रोजी सायंकाळी आमच्या शेतातुन उच्च दाबाची विद्युत तार ओढणाऱ्या ओटु कंपनीच्या कर्मचाऱ्यांना विरोध केला असता. सायंकाळी ७ वाजता गावातील काही जण व कंपनीचे कर्मचारी आणि १ बंदुकधारी पोलिस असे ३०-४० लोक आले आणि त्यांनी आम्हाला धक्काबुक्की करत तुम्हाला काय विचारायचे ? ? मावेजा वगैरे काही मिळणार नाही म्हणून खंडणीचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली. यावेळी उपस्थित बंदुकधारी पोलिस यांनी काहिही न करता फक्त बघत बसले.आम्ही पाणाड्याकडुन याठिकाणी बोर व विहिरीसाठी जागा बघितलेली असुन येथून विद्युत तार गेल्यावर विहिर कशी खोदणार असा प्रश्न उपस्थित केला. शिवाजी शिंदे यांचा मुलगा बालाजी शिंदे यांना पाटोदा पोलिस स्टेशनचे बीट अंमलदार यांनी फोन करून तुमच्यावर गुन्हे दाखल करण्यात आला असल्याचे सांगितले.तुम्ही कशाला विरोधात जाता म्हणून आमची बाजु ऐकुन न घेताच आम्हालाच विरोध न करण्याचा सल्ला दिल्याचे म्हटले आहे.

पवनचक्की कंपन्यांना विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल दुर्दैवी ; शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या लोकप्रतिनिधींना किंमत चुकवावी लागेल : डॉ.गणेश ढवळे

पान ४ वरून पुढे...

पवनचक्की कंपन्यांना विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांना दमदाटी, धमकावणे, त्यांना न विचारताच त्यांच्या शेतात काम करणे,मावेजा न देणे, विविध शेतकऱ्यांना वेगवेगळे मावेजा देणे, धनादेश न वटणे असे सर्रास प्रकार घडत असताना आता शेतकऱ्यांवर पोलिस प्रशासनाच्या मदतीने गुन्हे दाखल करणे दुर्दैवी आहे.लोकप्रतिनिधी ऐरवी शेतकऱ्यांचे आम्हीच कैवारी म्हणून गळा काढतात.सध्या शेतकरी या पवनचक्की कंपन्यांकडून नागवला जात आहे. जिल्हा व पोलीस प्रशासनाला हाताशी धरून कंपन्या शेतकऱ्यांच्या जमिनी घशात घालत आहेत.मात्र लोकप्रतिनिधी याबाबत जिल्हा प्रशासन अथवा पवनचक्की कंपन्यांना साधा जाब विचारायला तयार नाहीत.याची किंमत लोकप्रतिनिधींना निवडणुकीत मतदानाच्या वेळी चुकवावी लागणार असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी म्हटले आहे. जिल्हा व पोलीस प्रशासन कंपन्यांच्या हातचे बाहुले झाल्याने त्यांच्या कडुन न्यायाची अपेक्षा बाळगण्यात अर्थ नाही.

## शेतकरी बंधूंनो....

निवडलेल्या शेतकऱ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले.यावेळी या कार्यक्रमासाठी ऊ्वङ ऋछख इखजढएउक (ख)झतढ. ङ्ढऊ चे संचालक महेश लांडे,ओमप्रकाश तात्या खवतड,गोरखराव दन्ने सरपंच पोखरी,अरुण आबा लांडे(मा.पं. स.उपसभापती)दिलीप दादा लांडे उपसरपंच,अस्लम भैया पठाण,सुबोध फड, विष्णू सर लांडे,मा.सरपंच अण्णासाहेब लांडे,राधेशाम दादा फड,व गावातील इतर प्रगतशील शेतकरी त्याचबरोबर तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान ४ वरून पुढे...

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रोहित जाधव यांनी मानले.

## ढेकनमोहा येथे...

पाणी देण्यासाठी लागणारे पाईप, ४ शेळ्यां शेतीचे औजारे व घरगुती सामान याचे मोठे नुकसान झाले आहे. या मुळे थापडे कुटुंबावर आर्थिक संकट कोसळले असून, प्रशासनाने तात्काळ भेट घेऊन सदरील घटनेचा पंचनामा केला. सदरील प्रकरणात आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी श्रीराम थापडे व त्यांच्या कुटुंबीयांनी केली आहे.

## ईट गंगनाथवाडीचे...

भारत पाकिस्तान युद्ध चालू आहे त्या युद्धामध्ये आपण एन्जॉय करणं हे चुकीच आहे त्या मतावर ते ठाम होते, पण मित्र परिवाराने एक सामाजिक बांधिलकी जोपासत वृद्धाश्रमामध्ये अनाथ वृद्धांना फळ वाटप व अन्नदान कार्यक्रम देण्यात आला होता ,तसेच याप्रसंगी या कार्यक्रमाला उपस्थित, या निवारा बेगर प्रकल्पाचे संचालक राजु वंजारे सर, परमेश्वर गोंडे पाटील, रवीं, राजेश शिंदे,युवा नेते राम जाधव पाटील. समाधान खिंडकर ,केशव खांडे विष्णू बाप्पा खांडे ,रुग्नसेवक शरद झोडगे, बंजारा समाजाचे युवा नेते सुरेश पवार, विजय बहीर. युवा पत्रकार अंकुश गवळी, सुरेश ढोरमारे, अजय जाधव, सुदर्शन खांडे पाटील, प्रा. मसुराम गोंडे.आदी मान्यवर उपस्थित होते याप्रसंगी शंकर कदम पाटील यांना वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र राज्यातून शुभेच्छांचा वर्षाव, विविध क्षेत्रातील सामाजिक राजकीय शैक्षणिक पत्रकरिता क्षेत्रातील मान्यवरांनी

पान ४ वरून पुढे...

शुभेच्छा दिल्या,

## संत बंकटस्वामी...

मनाचिया जोगे सिध्दि पावे ।।२।।
कल्पतरुतळवटीं जो कोणी बैसला ।
काय वाणी त्याला सांगिजोजी ।।३।।
ज्ञानदेव म्हणे तरलों तरलों ।
आतां उध्दरलों गुरुकृपें ।।४।।

या अभंगावर सुंदर चिंतन मांडले यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की भजन आणि भोजन या शब्दा मध्ये काना आणि मात्रेचा फरक आहे.. पण भोजन मात्रेत असावे. भजन अमर्याद असावे असा भाव महाराजांनी सांगितला.आयुष्य मध्ये गुरू लागतो.गुरूशिवाय तरणोपाय नाही. आत्म उद्धार करण्यासाठी प्रत्येकाला संत बंकटस्वामी महाराज यांच्यासारखे श्रीगुरू पाठीशी असले पाहिजे. असे महाराज म्हणाले. लहान मुलांना संस्कार करणारी आज्जी आणि आजोबा घरात असले पाहिजे.साधूचे अंतःकरण दयाळू आणि कृपाळ असते.भव सागरातून काढून भाव सागरात घेऊन जातो तो तो गुरु असतो. म्हणून भजन सागरातून भवसागर तारण्याचं काम बंकटस्वामी महाराजांनी केले. असे महाराज म्हणाले.

कीर्तस साथ संगत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मृदंगाचार्य मृदंग सम्राट आसाराम महाराज साबळे, मृदंग अलंकार ओंकार महाराज कागदे यांच्यासह देवगड संस्थान चे लाडके गायक लक्ष्मण महाराज नागरे, सचिन महाराज पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# गाळ माफियांनी केला धुनकवाड येथील माजी उपसरपंचावर हल्ला

## दहा दिवस लोटले तरी आरोपी मात्र मोकाटच

### जिल्हाधिकारी साहेब कधी लक्ष देणार

## जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना अवैध गाळ उपशासाठी दिले होते निवेदन



**वडवणी । प्रतिनिधी**

धारुर तालुक्यातील धुनकवाड येथे माजी उपसरपंचावर गाळ माफिया व गावगुंडांनी जिवे मारण्याच्या उद्देशाने हल्ला करून हात व करंगळी फ्रॅक्चर करून गंभीर दुखापत केली आहे.असुन या आधी ही या गावगुंडावर ३०२ व इतर मारहाणी सारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत.त्यांच्या विरोधात धारुर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असुन हा गुन्हा दाखल होऊन दहा दिवसांचा कालावधी लोटला तरी सुद्धा आरोपी मोकाटच असुन पोलिसांचे या आरोपींकडे कानाडोळा आहे तरी हे आरोपी गावातच खुले आम फिरताना दिसत आहेत.

दि.३०/४/२०२५रोजी दत्ता भिमराव यादव यांनी जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक यांना धुनकवाड येथील कुंडलीका धरणातील अवैध गाळ उपसा बंद करा म्हणून निवेदन दिले होता हा ही मनात राग धरून गाळ माफिया व गावगुंडांनी माजी उपसरपंच वर हल्ला केला.

### जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना दिले होते निवेदन.

**धुनकवाड येथील माजी उपसरपंच दत्ता भीमराव यादव यांनी दि. ३०/४/२०२५ रोजी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना निवेदन देऊन धुनकवाड येथील कुंडलिका धरणातील अवैध गाळ उपसा बंद करा म्हणून निवेदन दिले होते हा मनात राग धरुन माजी उपसरपंच दत्ता भिमराव यादव यांना मारहाण केली असुन गाळ माफियांची मुजोरी वाढली असून जर हा गाळ उपसा बंद केला असता तर या माजी उपसरपंच हल्ला झाला नसता.**

दि.०२/०५/२०२५ रोजी माजी उपसरपंच दत्ता भिमराव यादव हे धारुर येथे आठवडी बाजार करिता मोटार सायकल वरुन जात असतांना दुपारी ३ वाजणेच्या सुमारास धुनकवाड फाटा येथे आलो असता तेथे त्यांच्याच भावकीतील दत्ता छत्रभुज यादव तिथे उभा होता त्याने मला जुने भांडणावरुन शिवीगाळ केली. परंतु मी त्यास न बोलता धारुर येथे आलो. आठवडी बाजार करुन धारुर येथुन गावी धुनकवाड येथे जात असतांना धुनकवड फाट्याजवळ रात्री ८ वाजण्याच्या सुमारास गावातील गावगुंड दत्ता छत्रभुज यादव हा तीथे उभा होता. त्याने माझे गाडीला हात करून थांबवले. त्यास काय झाले असे विचारले असता त्याने मला तु आता पटांगणामध्ये आला आहेस तु मागिल भांडणात चुकुन राहीला होतास तुला आता सुट्टीच नाही असे म्हणुन त्याचे जवळ ठेवलेला लोखंडी गज हातात घेऊन डाव्या हातावर मारुन मनगट व करगंळी फॅक्चर करुन गंभीर जखमी केले. त्यानंतर आमच्या गावातील गोरख गोविंदराव यादव, पाराराम गोंविदराव यादव, छत्रगुण गोविंदराव यादव, रामेश्वर छत्रगुण छत्रगुण यादव, गोवर्धन गोरख यादव,वचिष्ठ गोरख यादव, रामा विठ्ठल मस्के यांना फोन करुन बोलावुन घेतले. त्या सर्वांनी मिळुन लाथाबुक्याने मारहाण केली व गोरख गोविंदराव यादव यांनी त्यांना काठीने डाव्या हातावर मारुन मुक्कामार दिला.यानंतर त्यांचे चुलत भाऊ दत्ता सुर्यकांत यादव व नवनाथ शिवहार यादव यांना फोनकरुन बोलावुन घेतले. त्यांनी आमचे भांडणाची सोडवा सोडव केली. त्यानंतर माझे चुलत भाऊ यांनी मला धारुर पोलिस ठाण्यात तक्रार देण्यासाठी घेऊन आले. परंतु हाताला मार लागला असल्याने त्यांना उपचारासाठी धारुर येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवले व तेथील डॉक्टरांनी त्यांच्यावर प्रथमोपचार करुन पुढील इलाजाकरिता स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालय अंबाजोगाई येथे पाठवले. तेथे उपचार घेऊन आल्यानंतर धारुर पोलिस ठाण्यात येऊन दत्ता भिमराव यादव यांना मारहाण करणारे धुनकवाड येथील गाळ माफिया व गावगुंड दत्ता छत्रभुज यादव, गोरख गोविंदराव यादव, पाराराम गोंविदराव यादव, छत्रगुण गोविंदराव यादव, रामेश्वर छत्रगुण यादव, गोवर्धन गोरख यादव,वचिष्ठ गोरख यादव, रामा विठ्ठल मस्के यांच्या विरुद्ध तक्रार दाखल करुन भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ नुसार कलम ११८(२),११८(१), ११५(२), १९१(२), १९१(३), १९०, ३५१(२), ३५१(३) आदि कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी अद्यापही मोकाटच असुन गावात खुलेआम फिरत आहेत तरी याकडे पोलिसांचा मात्र कानडोळा असल्याचे दिसत आहे.

### गाळमाफियांची मुजोरी वाढली...

**गेल्या अनेक दिवसांपासून धुनकवाड येथील कुंडलीका धरणातील अवैध गाळ उपसा चालू असुन हे गाळ माफियांचा अनेकांना त्रास होत असुन हे गाळ माफिया अनेकांना धमकी देत आहेत यामुळे गाळ माफियांचा मुजोरी वाढली आहे.तरी प्रशासनाला पण ह्या गाळ माफियांना कधी पर्यंत पोसायचे आहे हे मात्र सांगता येईना.**

# गुंडगिरीला आळा घालण्यासाठी आणखी एका टोळीवर मकोका

## पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या कारवाईमुळे जिल्ह्यातील गुन्हेगारीला बसतोय आळा



### एसपींनी खांदेपालट करून ठाण्यांना सक्षम अधिकारी द्यावे, एसपी चांगले पण अनेक ठाणेदार करतायत कामात कसूर

**बीड । प्रतिनिधी**

मागील काही महिन्यांपासून गुन्हेगारी घटनांमुळे चर्चेत असलेल्या बीड जिल्ह्यात पोलिसांनी आक्रमक भूमिका घेत गुन्हेगारांना चपराक बसवण्यासाठी कठोर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या आणि पवनचक्की कंपनीला खंडणी मागितल्याच्या गुन्ह्यात अटकेत असलेल्या वाल्मीक कराडसह त्याच्या टोळीवर मकोका अंतर्गत गुन्हे दाखल केल्यानंतर आता आणखी एका टोळीवर मकोका लावण्यात आला आहे. परळी व अंबाजोगाई भागात दहशत निर्माण करुन धुमाकूळ घालणाऱ्या गुन्हेगारांच्या टोळीवर मकोका कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीचे व गुंडगिरीचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्दिष्टाने व व कलम ५५,५६,५७ मकोका अन्वये बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचा धडाका बीड जिल्हाचे पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली बीड पोलिसांनी सुरू ठेवला आहे. परळी शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्यातील आरोपींच्या तपासादरम्यान सदर आरोपी संघटितरीत्या गुन्हे करत असल्याचे आढळून आले. या पार्श्वभूमीवर त्यांच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये दरोड्याच्या गुन्ह्यातील मुख्य आरोपी टोळी प्रमुख रघुनाथ रामराव फड, जगन्नाथ विक्रम फड, सुदिप रावसाहेब सोनवणे, बालाजी अंकुश दहीफळे, विलास बालाजी गिते यांचा आणि फरार असलेल्या इतर दोन आरोपींचा समावेश आहे. सदर टोळीने आजपर्यंत संघटितरीत्या पो. स्टे. परळी शहर, संभाजीनगर व अंबाजोगाई ग्रामीण हद्दीत एकूण १० गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. परळीत नेमकी काय घटना घडली होती? दिनांक ०१ मार्च २०२५ रोजी न्यायालयाच्या आदेशानुसार पो.स्टे. परळी शहर गुरनं ४४/२०२५ कलम ३०७, ३२६, ३९२,३९४,३२३, ३२४,५०४, ५०६,३४ भादवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्यातील फिर्यादी सहदेव वाल्मीक सातभाई (वय २८ वर्षे, व्यवसाय शेती रा. तडोळी ता. परळी जि. बीड) हे दिनांक १८/१०/२०२३ रोजी दुपारी ०४.३० वाजता तडोळी येथून परळी वै. येथे ट्रॅक्टरचे काम करण्यासाठी व हप्ता भरण्यासाठी घरतून २ लाख

# 'निनगुर गावका कणकण बोले जय बंकटस्वामी महाराज' भजनाने कथा मंडप भावविभोर





**नेकनूर । प्रतिनिधी**

निनगुर गावका कणकण बोले जय बंकटस्वामी महाराज भजनाने श्रीमद् भागवत कथा मंडप भावविभोर झाला. संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात सुरू असलेल्या भव्य श्रीमद् भागवत कथेचा मोठ्या थाटात सांगता झाली.यावेळी बोलताना भक्ती सूर्य संत बंकटस्वामी कृपा प्रकाशाने ईश प्राप्ती होते. असे प्रतिपादन

कथाव्यास स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज देवगडकर यांनी केले. स्वामींच्या पुण्यभूमीत कथा करण्याचा भाग्य मिळालं. महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे प्रेम मिळाले. असे गौरवोद्गार महाराजांनी बोलून दाखवले.यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प राम महाराज डोंगर, श्री ह भ प श्रीहरी महाराज पवार,श्री ह भ प महंत तुकाराम महाराज भारती, कृष्णा महाराज वाघुले श्री ह भ प नाना महाराज कदम, श्री ह भ प सुरेश म जाधव यांच्यासह हजारो भाविक भक्त उपस्थित होते.

बीडच्या श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध भागवत कथाकार स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या सुश्राव्य वाणीतून सुरू असलेल्या कथेची सांगता झाली. सहा दिवस भगवंताच्या दशावताराची कथा ,भागवत महात्म्य , भक्ताची लक्षणे, भक्तीचे प्रकार, देवाला आवडणारा भक्त,गोकुळातील गोपीची भक्ती गोकुळातील रास लीला, देवाला आवडणारी साधना,मधुर बासरी, गोपाळांच्या भूमिकेतून वैकुंठ आणि वृंदावन याचा फरक रास लीला, गोपी सारखी भक्ती , गोपीभावाने केलेली भक्ती देवाला आवडते. गोपीना अहंकार झाला देव त्यांना दूर करतो.. अहंकार देवाला चालत नाही.. महारासलीला.. कंस वध, सुदामाचरित्र कथा सांगितली. यावेळी कथा मंडप भक्ती रसात न्हाऊन निघाला होता.

अरे द्वार पालो कन्हैया से कह दो की दर पे सुदामा गरीब आया है.!

**स्व संतोष देशमुख याचे बंधू धनंजय देशमुख यांनी अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथेचा भेट दिली..यावेळी भागवत कथेत श्रद्धांजली वाहण्यात आली. तसेच देशमुख कुटुंबाला दु:खातून सावरण्याचे बळ मिळावे.साधू संतांच्या महाराष्ट्रात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत न्यायाच्या लढाईत प्रत्येक भाविक सोबत आहे. संपूर्ण महाराष्ट्र हळहळला.. न्याय मिळाला पाहिजे. अशा भावना व्यक्त केल्या..**

हा कथा प्रसंग सांगताना मित्र प्रेम सुदामा आणि भगवान कृष्ण यांचे प्रेम अवर्णनीय आहे. तसेच सत्ता संपत्ती तारुण्य आणि सौंदर्य या गोष्टी सोबत विवेक असला पाहिजे..चांगले मित्र चांगले चित्र चांगले चरित्र हे आदर्श जीवनाचे सूत्र आहे. असे जीवन जगण्याची भागवत कथेतील सूत्र महाराजांनी सांगितले. यावेळी कथेत साथ सांगत लक्ष्मण महाराज नागरे (गायक),सचिन महाराज पवार (गायक),विष्णू महाराज घुने (अक्टोपॅड), दत्तात्रय महाराज तापकिरे (सिंथसायझर),संदीप महाराज नरके (तबला),दादा महाराज साबळे ( मृंदग), शिवम महाराज तोडकर (सनई शहनाई), शुभम महाराज बनकर ,सोमनाथ महाराज पानकडे यांची लाभली.



*जैताळवाडी तालुका बीड येथील विलास रामभाऊ आमटे यांच्या बैलावर वीज पडल्याने दगावला. दुपारी झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हा बळी घेतला.*


**नमुना ई-४**

[नियम १९ पहा]

**निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय :** ऋषिकेश कातळे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, धारूर

**सहकारी संस्थेचे नाव :** विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. पांगरी, ता. धारूर जि. बीड

नियम १९ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी जाहीर केलेल्या उपरोक्त सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांच्या निवडणुकीकरिता मी ऋषिकेश कातळे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, धारूर जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, बीड यांचे पूर्व मान्यतेने विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. पांगरी, ता. धारूर जि. बीड यांच्या समितीच्या सदस्यांची निवडणूक घेण्याकरिता नियुक्त केलेला निवडणूक निर्णय अधिकारी, याद्वारे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. पांगरी, ता. धारूर जि. बीड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांची निवड करण्याच्या निवडणुकीच्या कार्यक्रमातील विविध टप्पे तयार व जाहीर करीत आहे आणि यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ-१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मतदार संघाच्या संबंधातील निवडणुका घेण्याचे नियत करीत आहे.

**अनुसूची** **अंतिम यादी प्रसिद्धी दिनांक २५.०४.२०२५**

| अ क्र | मतदार संघाचे नाव | निवडून द्यावयाच्या जागा | नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यासाठीचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशन पत्रे मिळतील ती जागा) | नाम निर्देशन पत्रांची सूची प्रसिद्ध करणे | नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचा दिनांक व वेळ | वैध नामनिर्देशन पत्रांची सूची प्रसिद्ध करण्याचा दिनांक | उमेदवाराने नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याचा दिनांक | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतिम यादीचे प्रकाशन करण्याचा दिनांक | मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक, वेळ व मतदानाचे स्थळ | मतमोजणीचा दिनांक, वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल घोषित करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | सर्वसाधारण खातेदार कर्जदार प्रतिनिधी | ८ | १३.०५.२०२५ ते १९.०५.२०२५ ११.०० ते १५.०० | १३.०५.२०२५ ते १९.०५.२०२५ १७.०० वा | २०.०५.२०२५ ११.३० वा. | २१.०५.२०२५ ११.०० वा. | २१.०५.२०२५ ते ०४.०६.२०२५ ११.०० ते १४.०० | ०५.०६.२०२५ ११.०० वा. | १५.०६.२०२५ स. ०८.०० वा. ते १६.०० वा. (ठिकाण नंतर जाहीर करण्यात येईल.) | १५.०६.२०२५ मतदानानंतर (ठिकाण नंतर जाहीर करण्यात येईल.) | १५.०६.२०२५ मतमोजणीनंतर (ठिकाण नंतर जाहीर करण्यात येईल.) |
| २ | अनुसूचित जाती/ जमाती प्रतिनिधी | १ | | | | | | | | | |
| ३ | महिला प्रतिनिधी | २ | | | | | | | | | |
| ४ | इतर मागासवर्गीय प्रतिनिधी | १ | | | | | | | | | |
| ५ | विमुक्त जाती/ भटक्या जमाती/ विशेष मागास प्रवर्ग प्रतिनिधी | १ | | | | | | | | | |
| | एकूण जागा | १३ | | | | | | | | | |

**टीप :-** ०१. मतदार यादी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात विकत मिळू शकेल. ०२.स्तंभ क्र.०३ ते ०८ चे ठिकाण कार्यालय, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, धारूर असे राहील. ०३. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, धारूर यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेल्या चिन्हांच्या यादी मधून निवडणूक चिन्ह निवडावयाचे आहे. ०४. निवडणूक कार्यक्रम शासकीय व सार्वजनिक सुट्ट्या वगळून राहील.

**निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता :** सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, धारूर, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाजवळ, केज रोड, धारूर.

**संपर्क क्रमांक :** 8108597989, **ई-मेल :** rushikeshkatale@gmail.com

शिक्का

स्वाक्षरीत/-
(ऋषिकेश कातळे)
निवडणूक निर्णय अधिकारी,
विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. पांगरी, धारूर जि. बीड

स्वाक्षरीत/-
(समृत जाधव)
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड

स्वाक्षरीत/-
(अशोक गाडे)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र, पुणे

दैनिक मराठवाडा पत्र
epaper.marathwadapatra.com
सोमवार, दि.१२ मे २०२५ पान ४



ईट परिसरामध्ये वादळी वाऱ्यासह इजांच्या कडकडासह रविवारी पावसाचे आगमन झाल्याने ईट परिसरातील अनेक घरावरची पत्रे उडून गेली कांदा आंबा अशा अनेक पिकांचे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे. (छाया आराध्या नरनाळे ईट)

# अखेर पवनचक्की कंपन्यांना विरोध करणाऱ्या पाटोदा तालुक्यातील बेडुकवाडी येथील शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल



## पोलिस प्रशासनाच्या मदतीने पवनचक्की कंपन्यांची रझाकारी सुरु : डॉ.गणेश ढवळे

**पाटोदा । प्रतिनिधी**

जिल्हा आणि पोलिस प्रशासन पवन आणि सौर ऊर्जा कंपनीच्यांचे हस्तक झालेले असुन कंपन्यांना शेत जमीनीचा ताबा देण्यासाठी पोलिस प्रशासन अधिकार क्षेत्राच्या बाहेर जाऊन मावेजा मागणा-या शेतकऱ्यांनाच पोलिसी खाक्या दाखवत असुन खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देत असल्याचे प्रकार पाटोदा तालुक्यात आढळून येत असतानाच पाटोदा तालुक्यातील दासखेड ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत बेडुकवाडी येथील पवनचक्की कंपन्यांना विरोध करणाऱ्या शेतकरी शिवाजी बाजीराव शिंदे, बालाजी शिवाजी शिंदे आणि जेसीबी आपरेटर या तिघांवर ओटु पवनचक्की कंपनीचे कर्मचारी मोहन रामा गाडे यांच्या तक्रारीवरुन भादंवि ११५(२) ,१२६(२),३०८(२), आणि ३०८(३) (५) कामाला विरोध करणे, जाणिवपूर्वक हत्येचा प्रयत्न करणे आदी कलमांतर्गत दाखल करण्यात आल्याचा दुर्दैवी प्रकार घडला आहे.जर जिल्हा आणि पोलिस प्रशासन शेतकऱ्यांवरच अन्याय करत असेल तर शेतकऱ्यांनी मावेजा मागण्यासाठी कोणाच्या दारात जायचे. पाचेगाव येथील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांना प्रत्यक्ष भेटून जनता दरबारात आपली व्यथा मांडली परंतु त्यांना न्याय देण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी असमर्थता दाखवली. त्यामुळे जे जिल्हा प्रशासन व पोलिस प्रशासन शेतकऱ्यांच्या जमिनी कंपन्यांच्या ताब्यात देण्यासाठी अमर्याद अधिकार वापरते ते प्रशासन शेतकऱ्यांवर झालेल्या अन्यायाची आस्थेवाईकपणे चौकशी करत नाही आणि लोकप्रतिनिधी याबद्दल चकार शब्द काढत नाहीत हि शोकांतिका असल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली आहे.

आम्हाला न विचारताच आमच्या शेतजमिनीत तारा ओढण्यास विरोध केला म्हणून आमच्यावर खोटे गुन्हे दाखल केले : शिवाजी शिंदे व बालाजी शिंदे ( बेडुकवाडी ता.पाटोदा) ▶▶ उर्वरित पान २ वर

धरती ॲग्रो एजन्सी घाटसावळी आयोजित शेतकरी कुपन लकी ड्रॉ व खरीप पूर्व शेतकरी मार्गदर्शन मेळावा संपन्न

# शेतकरी बंधूंनो कृषी विभाग तुमच्या पाठीशी- मंडळ कृषी अधिकारी अंभुरे साहेब

**बीड । प्रतिनिधी**



धरती ॲग्रो एजन्सी घाटसावळी आयोजित शेतकरी कुपन लकी ड्रॉ २०२५ व खरीप पेरणीपूर्व मार्गदर्शन मेळावा कृषी विभाग बीड यांच्यावतीने आयोजित करण्यात आला होता, यावेळी बीड जिल्हा कृषी विभाग यांच्या वतीने शेतकऱ्यांना खरीप पेरणीपूर्व मार्गदर्शन करण्यासाठी मंडळ कृषी अधिकारी श्री.अंबुरे साहेब उपस्थित होते. उपस्थित शेतकऱ्यांना अंबुरे साहेब यांनी ग्रीस्टॅक अर्थात फार्मर आयडी त्याचबरोबर बियाणे खरेदी करताना घ्यावयाची काळजी, बीज प्रक्रिया, महाराष्ट्र शासन कृषी विभाग यांच्या शेतकऱ्यांसाठी असणाऱ्या अनुदानित व विनाअनुदानित कृषी योजना इत्यादी महत्त्वाच्या विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले. त्याचबरोबर त्यांच्यासोबत कृषी सहाय्यक श्री गणेश घोडके साहेब व कृषीमित्र IIL कंपनी चे अशोक खंडागळे यांनी सुद्धा बीज प्रक्रिया व कीड व रोग व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले. शेवटी धरती ॲग्रो एजन्सी घाटसावळी यांच्याकडून शेतकऱ्यांना लकी ड्रॉ कुपन च्या माध्यमातून

▶▶ उर्वरित पान २ वर

# मस्साजोग येथील नदी खोलीकरण कामाची ॲड. अजित देशमुख यांनी केली पाहणी

**बीड । प्रतिनिधी**



नाम फाउंडेशन मार्फत मस्साजोग येथील नदी खोलीकरणाचे काम चालू आहे. या कामाची पाहणी जन आंदोलनाचे विश्वस्त अूड. अजित एम. देशमुख यांनी आज केली. काम चांगल्या पद्धतीने चालू असून नदीची खोली आणि रुंदी देखील चांगली असल्याने देशमुख यांनी यावेळी समाधान व्यक्त केले.

नाम फाउंडेशन मार्फत नदी खोलीकरणासाठी ॲड. अजित देशमुख यांनी मशीन उपलब्ध करून दिल्यानंतर जवळपास तीन किलोमीटर परिसरातील नदीचे खोलीकरण होत आहे. या कामाने वेग घेतला असून यातून मोठ्या प्रमाणात पाणीसाठा होणार असल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये देखील उत्साहाची वातावरण आहे.

नदी परिसरात फिरताना आज धनंजय देशमुख, भागवत कदम, तुषार देशमुख, सुदर्शन देशमुख, मनोज देशमुख यांच्यासह शेतकरी देखील मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कामाची गती आणखी वाढवून कामाचे प्रमाण देखील वाढवावे, असे यावेळी देशमुख यांनी म्हटले. या नदीपात्रात असलेले बंधारे आता मोठ्या प्रमाणात पाणी साठवून ठेवणार असल्यामुळे पावसाळ्यात शेतकऱ्यांच्या मनातील आनंद वृद्धिंगत होणार आहे. यातून पिकत नसलेली शेती आता पिकणार असल्यामुळे शेतकरी देखील समाधान व्यक्त करत होते.

# ढेकनमोहा येथे गोठ्याला लागलेल्या आगीत मोठे नुकसान

## चार शेळ्यांचा मृत्यू, शेतीसाठीचे अवजारे व कडबा गंज जळून खाक

**ढेकनमोहा । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील ढेकनमोहा येथे शनिवारी रात्रीच्या सुमारास श्रीराम थापडे यांच्या गोठ्याला आग लागून मोठे नुकसान झाले. या आगीत दोन शेळ्या व दोन बोकडे (एकूण चार शेळ्या) जळून मृत्युमुखी पडले असून, गोठ्यातील सर्व शेती उपयोगी साहित्य तसेच कडब्याची गंजही पूर्णतः जळून खाक झाली.

सदर घटना रात्री उशिरा घडल्यामुळे गोठ्यात असलेल्या शेळ्यांना वाचविण्याचा प्रयत्न नागरिकांनी केला पण सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. आग लागल्याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, प्राथमिक माहितीनुसार ही आग लावण्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. सदरच्या घटनेमुळे शेतीत ▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड: भाचे संभाजी डोईफोडे यानचा नुकताच विवाह संपन्न झाला या नवदाम्पत्याला शुभेच्छा देताना दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे, सौ. ज्योती दत्तात्रय नरनाळे छायाचित्रात दिसत आहेत.*

# ईट गंगनाथवाडीचे उपसरपंच शंकर कदम पाटील यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा

## जिव्हाळा निवास बेगर या निवास मधल्या व्यक्तींना अन्नदान, फळ वाटप कार्यक्रम


**बीड । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील ईट गंगनाथवाडी येथील, उपसरपंच शंकर कदम पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त बीड शहरातील जिव्हाळा निवास बेगर या ठिकाणी वाढदिवसानिमित्त गोरगरीब अनाथ वृद्धांना फळे वाटप अन्नदान चा कार्यक्रम मित्र परिवारांनी आयोजित केला होता, याप्रसंगी डीजे न वाजवता गोरगरीब वृद्ध परिवारा समवेत वाढदिवस साजरा केला, याप्रसंगी कदम पाटील आपल्या भाषणात म्हणाले आहेत की तरुणांनी व्यर्थ खर्च न करता सामाजिक बांधिलकी जोपासत आपण आपलं कार्य केले पाहिजे, गोरगरीब जनतेची सेवा आपल्या माध्यमातून झाली पाहिजे याप्रसंगी त्यांनी वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला होता सध्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# संत बंकटस्वामी महाराज यांच्या काकडा भजनात प्रत्यक्ष पांडुरंग ऐकायला यायचा: समाधान महाराज शर्मा

**नेकनूर । प्रतिनिधी**





संत बंकटस्वामींचे काकडा भजन पांडुरंगाला आवडायचे त्यामुळे प्रत्यक्ष पंढरीश पांडुरंग ऐकायला यायचा.देवाला आवडणारे भाजप बंकटस्वामीचे होते असे प्रतिपादन श्री ह भ प समाधान महाराज शर्मा यांनी केले.संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवास भेट दिली असता ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प राम महाराज डोंगर, श्री ह भ प महंत तुकाराम महाराज भारती, श्री ह भ प नाना महाराज कदम, श्री ह भ प सुरेश म जाधव यांच्यासह हजारो भाविक भक्त उपस्थित होते.

बीडच्या श्रीक्षेत्र नेकनूर येथे वारकरी संप्रदायातील महान संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात पाचव्या दिवसाचे कीर्तन पुष्प महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री ह भ प समाधान महाराज शर्मा यांचे संपन्न झाले. यावेळी त्यांनी संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या

श्रीगुरुसारिखा असतां पाठीराखा ।
इतरांचा लेखा कोण करी ।।१।।
राजयाची कांता काय भीक मागे ।

▶▶ उर्वरित पान २ वर

# आई-वडिलांची सेवा हीच सर्वश्रेष्ठ सेवा आहे : ह.भ.प. विजय महाराज गवळी

**केज । प्रतिनिधी**

आई-वडिलांची सेवा हीच सर्वश्रेष्ठ सेवा आहे. मुलाम ुलींमध्ये कधीही भेद करू नये. मुलींना उच्च शिक्षण द्यायला हवे असे कीर्तनातून ह भ प विजय महाराज गवळी यांनी मत व्यक्त केले.

जवळबन येथील प्रा डॉ राजेश करपे व अशोक करपे यांचे वडील कै नारायण सिताराम करपे यांच्या वर्ष श्रद्धा निमित्त शनिवार रोजी कीर्तन संपन्न झाले यावेळी ह भ प गवळी महाराज यांनी निरूपण केले

संतांनी दिलेला विचार आत्मसात करून त्या मार्गावर आपण सर्वांनी चालायला हवे. सर्व काही माझे म्हणून स्वार्थी वृत्तीने वागू नये. संतांचा विचार मानवी जीवनाला तरणोपाय आहे असे संतपर अभंगाचे संदर्भ देऊन निरूपण केले. यावेळी गायनाचार्य गणेश महाराज यांच्यासह भजनी मंडळ यांची उपस्थिती होती.

